अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/७९६
दिनांक :- २२/०५/२०२०

## आदेश

विषय : **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
सर्वसाधारण कामकाजात मदतीसाठी स्वयंसेवक नियुक्त करणेबाबत.
संदर्भ : १) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०.

संदर्भ क्र. १ चे अधिनियमांतील भाग ६ - स्थानिक प्रशासन, नियम ४१ (२) नुसार स्थानिक प्रशासनास आपत्ती व्यवस्थापन कार्यास आवश्यक वाटेल अशा उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. संदर्भ क्र. २ चे महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० मधील १० (ऐ) नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्या भौगोलिक क्षेत्रामधील सर्व शासकीय विभाग/संस्थांच्या आस्थापनेवरील किंवा निर्देशित करतील अशा कोणत्याही व्यक्तींच्या सेवा कोव्हीड १९ या रोगाचे नियंत्रण/प्रतिबंधात्मक/आपत्कालीन उपाययोजना करण्याचे कामासाठी अधिग्रहित करता येतात.

उपरोक्त तरतुदी विचारात घेऊन पुणे महानगरपालिका संकेतस्थळावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे सर्वसाधारण कामकाजात मदतीसाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्यास इच्छुक स्वयंसेवी संस्था स्वयंसेवक व इतर स्वयंसेवक यांनी अर्ज करावेत असे अवाहन केलेले होते.

वरील अवहनास प्रतिसाद देऊन अर्ज केलेल्या व्यक्तींमधून विषयांकित कामी स्वयंसेवक म्हणून खालील स्वयंसेवकांच्या सेवा कोव्हीड १९ या रोगाचे नियंत्रण/प्रतिबंधात्मक/आपत्कालीन उपाययोजना करण्याचे कामकाजासाठी निम्नलिखित अटी व शर्तीचे अधीन अधिग्रहित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | नियंत्रण करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, हुद्दा, संपर्क क्रमांक. | स्वयंसेवकांचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक | नियुक्त केलेले ठिकाण व सोपविले कामकाज |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. सुनिल इंदलकर,<br>उप आयुक्त,<br>मध्यवर्ती भांडार कार्यालय<br>(मो.क्र.८३०८३११०१०) | श्री.संतोष गाडेकर,<br>१५०, शिवाजी नगर, शिरोळे गल्ली, पुणे<br>(मो.क्र.८२०८८९६६५९) | मध्यवर्ती भांडार कार्यालय |
| | | श्रीमती राजश्री आर.गाडेकर,<br>फ्लॅट नं.१०, प्रीती कुंज सोसायटी, पानकुवर फिरोदिया पथ, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे (मो.क्र.७३५०६६९०९६) | |
| | | श्री.प्रेम राठी,<br>११९४/२४, सोबा नुक अपार्ट., घोले रोड, शिवाजीनगर, पुणे (मो.क्र.९०२१२८१२९४) | |
| | | श्री.प्रशांत उत्तमराव पंडीत,<br>स.नं.५६२/२, फ्लॅट नं.११/A, आर्यावर्त सोसायटी, शिवाजीनगर, गावठाण, पुणे.<br>(मो.क्र.८१४९५३१०८०) | |
| | | श्री.आकाश भालेराव,<br>२४९, शनिवार पेठ, आनंद बिल्डिंग<br>(मो.क्र.९७६६६५९६६६) | |

**अटी व शर्ती :**

१) नियुक्ती पत्र प्राप्त झाल्यावर पुढील २४ तासात आपण वरील नियुक्तीचे ठीकाणी हजर होऊन नियंत्रण करणाऱ्या अधिकारी यांना नियुक्ती पत्रासह व लेखी रुजू रिपोर्ट द्यावा, नियंत्रण करणाऱ्या अधिकारी यांनी एकत्रित अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

२) उपरोक्त स्वयंसेवक यांची नियुक्ती त्यांचे स्वतःचे आवेदन पत्रात सादर केलेली माहिती/कागदपत्रे प्रमाणित असल्याचे मानून केलेली आहे, दिलेली माहिती/कागदपत्रे नंतर केव्हाही असत्य आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित स्वयंसेवकाची असेल.

३) आपली वरील संदर्भित अधिनियम व नियम यानुसार आपत्कालीन परिस्थिती संपुष्टात अथवा नियंत्रणात येईपर्यंत मदतीसाठी स्वयंसेवक म्हणून नियुक्ती केलेली आहे, याकामी आपणास कोणतेही मानधन अथवा भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

४) या नियुक्तीचे सेवेमुळे आपणास अन्य कोणत्याही पदावर नियुक्ती मिळण्याचा अथवा समावेशनाचा अधिकार प्राप्त होणार नाही.

५) वरील स्वयंसेवकांना प्रत्येक सप्ताहात एक साप्ताहिक सुटी दिली जाईल, त्याव्यतिरीक्त त्यांनी प्रत्येक कामकाजाचे दिवशी व ठरवून दिलेल्या वेळेतच काम करणे आवश्यक असेल.

६) नियुक्त केलेले स्वयंसेवक दिलेले काम योग्य प्रकारे करीत नसल्याचे किंवा त्यांनी केलेले काम परिपूर्ण तथा दर्जात्मक नसल्याचे, वर्तन चांगले नसल्याचे आढळल्यास त्यांची सेवा रद्द करण्यात येईल.

७) उपरोक्त स्वयंसेवक पुणे महानगरपालिका प्रशासनाचे वतीने काम करीत असल्याने स्वयंसेवक उमेदवारांनी आपले वर्तन सौजन्याचे व नि:संशयपणाचे ठेऊन शहरातील नागरिक/रुग्ण यांचेमधील पुणे महानगरपालीकेची प्रतिमा मलिन होणार नाही यांची दक्षता घ्यावी.

८) उपरोक्त स्वयंसेवक यांना त्यांचे कामकाजाची, सुरक्षेची आवश्यक वाटतील अशी साधने ( उदा. पेन, स्टेशनरी, मास्क, कॅप, सॅनीटायझर, साबण इ.), तसेच **"तात्पुरते ओळखपत्र"** नियंत्रक अधिकारी यांनी प्राधान्याने उपलब्ध करून द्यावीत. पुरविलेल्या सुरक्षा साधनांचा उपरोक्त स्वयंसेवक यांनी वापर करणे सक्तीचे आहे.

९) नियुक्त केलेले स्वयंसेवक यांनी त्यांचेकडे सोपविलेल्या कामकाजाबाबत नागरिक, प्रसिद्धी माध्यमे यांचेकडे कोणतीही चर्चा/टिप्पणी करू नये. तसेच त्यांना सोपविलेले सर्व साहित्य, कागदपत्रे, ओळखपत्र इ. त्यांचे नियंत्रक अधिकारी यांचेकडे सुपूर्त करून मगच त्यांनी कार्यमुक्त व्हायचे आहे.

१०) नियुक्त केलेले स्वयंसेवक उपरोक्त अटी व शर्ती वाचून व मान्य करून रुजू झालेले आहेत, असे समजण्यात येईल.

**(रुबल अग्रवाल)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि/इ) यांना माहितीस्तव.